**ठळक बातम्या**

- प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढणं आवश्यक असून, त्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज, असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन/ उद्गीर इथं बुद्धविहाराचं केलं लोकार्पण

- ब्रुनेईचा दौरा आटोपून प्रधानमंत्री सिंगापूरला रवाना

- राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य धैर्यशील पाटील यांचा शपथविधी

**आणि**

- मराठवाडा आणि विदर्भात पावसामुळे झालेल्या नुकसानाचे पंचनामे आणि मदतीची कार्यवाही त्वरित करण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना

**<><><><><>**

प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढणं आवश्यक असून, त्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केली आहे. लातूर जिल्ह्यात उदगीर इथं महिला सक्षमीकरण मेळाव्यात त्या बोलत होत्या. प्रत्येक क्षेत्रात महिलांची सक्रीय भागीदारी वाढवण्यासाठी बचत गटांची भुमिका महत्वाची असल्याचं त्या म्हणाल्या. महिला शिक्षित झाली, तर पूर्ण कुटुंब आणि भावी पिढी शिक्षित होते, हेच समीकरण सक्षमीकरणासाठी देखील लागू होतं, असं राष्ट्रपतींनी यावेळी सांगितलं. राज्य सरकार महिलांचं आरोग्य आणि पोषण सुधारण्यासाठी

अनेक प्रयत्न करत असल्याचं सांगून त्यांनी, महिलांनी आपल्या आरोग्यावर लक्ष केंद्रीत करावं, आपल्या आणि कुटुंबाच्या भविष्यासाठी स्वत:कडे देखील लक्ष देण्याचं आवाहन केलं.

वीरमाता जिजाबाई, सावित्रीबाई फुले, संत बहिणाबाई, कवयित्री बहिणाबाई चौधरी, समाज सेविका सिंधुताई सपकाळ, यांच्या कार्याचा आपल्या भाषणात उल्लेख करत राष्ट्रपतींनी, अशा महान महिलांकडून प्रेरणा घेऊन महिला कार्य करतील, असा विश्वास व्यक्त केला. महिलांचा सन्मान करणं आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असून, पुरुषांनी महिलांची क्षमता ओळखून त्यांना मदत करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

केंद्र आणि राज्य सरकारच्या महिला सक्षमीकरणासह शेतकरी आणि युवकांसाठी असलेल्या अनेक योजनांचा देखील त्यांनी उल्लेख करत, या योजनांचा लाभ घेण्याचं आवाहन केलं. महिला सशक्तिकरणाच्या या योजना पाहून आपण समाधानी असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या. महिला आणि युवकांचा सर्वांगिण विकास विकसित भारताचं उद्दीष्ट साध्य करण्यासाठी महत्वाचा असल्याचं त्यांनी नमूद केलं. महाराष्ट्र सरकारने २५ लाख महिलांना लखपती दीदी बनवण्याचं उद्दीष्ट ठेवलं, हे कौतुकास्पद असल्याचं त्या म्हणाल्या.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लातूरचे पालकमंत्री गिरीष महाजन, मंत्री संजय बनसोडे, महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यावेळी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण, तसंच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतल्या लाभार्थींना लाभाचं वाटप करण्यात आलं.

लाडक्या बहिणींचा सन्मान करण्यासाठी राष्ट्रपती स्वत: आल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे आभार मानले. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेत एका महिलेला तीन गॅस सिलिंडर देणार असल्याचं सांगून मुख्यमंत्र्यांनी, राज्य सरकारच्या महिला आणि शेतकऱ्यांसाठीच्या इतर योजनांची माहिती दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना बंद होणार नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन सरकार वाटचाल करत असल्याचं उपमुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. राज्यात एक कोटी लखपती दीदी तयार करणार असून, लाडकी बहिण योजनेचं राजकारण न करण्याचं आवाहन त्यांनी विरोधकांना केलं.

महिला सशक्त झाल्या, तरच आपल्या देशाचा विकास होईल, असं मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केलं. महिलांच्या सक्षमीकरणासाठी सरकार प्रयत्न करत असल्याचं मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या. लातूर जिल्ह्यात पाच लाखाहून अधिक महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ देण्यात यश मिळाल्याचं त्यांनी सांगितलं.

उदगीर तालुक्याला स्वतंत्र जिल्ह्याचा दर्जा देण्याची, तसंच उदगीर इथं वैद्यकीय महाविद्यालय उभारण्याची मागणी मंत्री संजय बनसोडे यांनी यावेळी केली. उदगीर इथं उभारण्यात आलेल्या बुद्ध विहाराचं राष्ट्रपतींच्या हस्ते लोकार्पण झालं. याविषयी अधिक माहिती आमच्या वार्ताहराकडून ----

## व्हॉईस कास्ट- पीटीसी - लातूर

राष्ट्रपती मुर्मू आज नांदेडच्या तख्त श्री सचखंड हुजूर साहिब गुरुद्वाराला भेट देणार असून नांदेड विमानतळावरून दिल्लीकडे प्रयाण करतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ब्रुनेईचे सुलतान हाजी हसनल बोल्किया यांच्याशी चर्चा केली. उपग्रह प्रक्षेपण आणि देखरेखीसंदर्भात महत्त्वाच्या करारावर उभय नेत्यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या झाल्या. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर आणि ब्रुनेईचे दूरसंपर्कमंत्री पेंगिरान दातो मुस्तफा यावेळी उपस्थित होते. सुलतान हाजी हसन अल बोलकिया यांच्याशी उभयपक्षी व्यापार आणि सांस्कृतिक संबंध वाढवण्याबद्दल समाधानकारक चर्चा झाल्याचं प्रधनमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टमधे म्हटलं आहे. उर्जा, अंतराळ, तंत्रज्ञान, आरोग्य, संरक्षण आदि क्षेत्रातल्या सहकार्याविषयी या भेटीत विचारविनिमय झाल्याचं उभय नेत्यांनी नंतर प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे. भारत ब्रुनेई संबंधांना ४० वर्ष होत असताना प्रधानमंत्र्यांचा हा दौरा झाला. भारताचं धोरण विस्तारवाद नव्हे तर विकासवादाचं आहे असं प्रधानमंत्र्यांनी या भेटीत स्पष्ट केलं.

ब्रुनेईचा दौरा आटोपून प्रधानमंत्री सिंगापूरला रवाना झाले. सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांच्याशी ते दोन्ही देशांतल्या धोरणात्मक भागीदारीविषयी चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

राज्यसभेवर निवडून गेलेले भाजपाचे धैर्यशील पाटील यांचा शपथविधी आज झाला. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी नवनिर्वाचित सदस्यांना सदस्यत्वाची

शपथ दिली. किरण चौधरी, रामेश्वर तेली, जॉर्ज कुरियन, अभिषेक मनु सिंघवी या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधीही आज झाला.

**<><><><><>**

प्रौढांना क्षयरोग प्रतिबंधक बीसीजी लस देण्याच्या मोहिमेचं उद्घाटन आज धारशिव इथं झालं. या मोहिमेत ६० वर्षावरील सर्व व्यक्तींना लस देण्यात येणार आहे. १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या निवडक व्यक्तींचाही लसीकरणात समावेश असेल. त्यात गेल्या पाच वर्षात उपचार पूर्ण झालेले क्षयरुग्ण, क्षय रुग्णांच्या सहवासातल्या व्यक्ती, कुपोषित, मधुमेही आणि धूम्रपान करणारे अशा व्यक्तींना त्यांची संमती घेऊन लस देण्यात येणार आहे.

**<><><><><>**

मूलभूत सुविधा पुरवाव्यात या मागणीवरून बीड परळी मार्गावर नागरिकांनी आज तासभर रास्ता रोको आंदोलन केलं. आंदोलकातल्या एकानं रस्त्यावरच्या खड्ड्यात झोपत तीव्र भावना व्यक्त केल्या. दरम्यान, खासदार बजरंग सोनवणे यांनी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली. तेलगाव नाका परिसरात स्वच्छता करावी तसंच नागरी सुविधा देण्यात याव्यात अशी आंदोलकांची मागणी होती. यावेळी रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

**<><><><><>**

मराठवाडा आणि विदर्भातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस झाला आहे. पावसामुळे झालेल्या नुकसानाचे पंचनामे आणि मदतीची कार्यवाही त्वरित करण्याची सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. पिकांचं नुकसान, घरांची पडझड, पशुधनाची हानी अशा सगळ्या नुकसानाची माहिती घेऊन

लवकरात लवकर पंचनामे करावेत तसंच, पुरामुळे तात्पुरतं स्थलांतर केलेल्यांना आवश्यक सुविधा देण्यात याव्यात असे आदेश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

बीड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून संततधार पाऊस सुरू असून त्याचा फटका खरीप हंगामातल्या तूर, बाजरी, उडीद, कांदा, मूग या पिकांना बसला आहे. काही ठिकाणी फळबागा जमीनदोस्त झाल्या आहेत. शेतात पाणी साचल्यामुळे कापूस आणि सोयाबीन ही पिकं धोक्यात आली आहेत. जिल्ह्यातल्या ६११ गावांमधल्या १ लाख २५ हजार ७२४ शेतकऱ्यांचं २ लाख ३ हजार ४१५ हेक्टरवरच्या पिकांचं नुकसान झाल्याचा अहवाल कृषी विभागानं दिला आहे.

धाराशिव जिल्ह्यात २८ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या काळात झालेल्या संततधार पावसामुळे ६ हजार ६७ हेक्टर क्षेत्रावरच्या पिकांचं तर १७७ हेक्टर क्षेत्रावरच्या बागायतीचं नुकसान झाल्याचा अहवाल कृषी विभागानं दिला आहे. यात उडीद, मूग, सोयाबीन, मका, कांदा, डाळिंब, पेरू, पपई या पिकांचं नुकसान झालं आहे. भंडारा जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून संततधार सुरू असल्याने बागायती शेतीचं नुकसान झालं आहे.

//<><><><><>//